# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे - 01

दूरध्वनी क्र. -020-26123066/67 वेबसाईड - www.mscepune.in ई-मेल mscepune@gmail.com


जा.क्र.मरापप/भांडार/Inte.Audit/2023/ 4173 दिनांक :- 06 /07/2023

प्रति,

----------------------

----------------------

----------------------

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील वसूल केलेले आयकर व जीएसटी विवरणपत्रे विहित दिनांकास सादर करण्याकरिता व लेखाविषयक अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामकाजाकरिता सनदी लेखापालाची नियुक्ती करणेसाठीचे दरपत्रक.**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील वसूल केलेले आयकर व जीएसटी विवरणपत्रे विहित दिनांकास सादर करण्याकरिता व लेखाविषयक अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामकाजाकरिता सनदी लेखापालाची नियुक्ती सन 2023-2024 व 2024-2025 या वित्तीय कालावधीसाठी करण्यासाठी मोहोर बंद व ठळक अक्षरात दरपत्रक मागविण्यात येत आहे. दरपत्रक मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्याकडे पोहचविण्याची अंतीम मुदत दि 12/07/2023 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत आहे. यानंतर परिषदेस प्राप्त झालेली दपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. याची नोंद घेण्यात यावी.

1.दरपत्रक मोहोरबंद पाकिटात असाव्यात व पाकिटावर दरपत्रक लिहावे व ज्या पत्र क्रमांकानुसार बोलविण्यात आलेले आहे त्या पत्राचा क्रमांक व दिनांक नमूद करावा.

2.दरपत्रक स्विकृतीची वेळ कार्यालयीन वेळत सकाळी 09.45 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत असून चौथ्या मजल्यावरील आयुक्त दालनात उघडण्यात येईल. त्यावेळेस आपण अथवा आपला प्रतिनिधी योग्य त्या ओळखपत्रासह हजर राहू शकतो. काही प्रशासकीय वा कार्यालयीन अडचणीमुळे दरपत्रक उघडणे शक्य नाही तर लगतच्या नंतरच्या दिनांकास वा परिषदेच्या सोयीनुसार ठरवून दिलेल्या दिवशी उघडण्यात येतील.

3.दरपत्रकात सेवेसाठीचा दर वस्तू व सेवा करासहित (GST) समाविष्ट करण्यात यावा.

4.सेवा पुरवठादाराकडे अधिकृत परवाना असणे आवश्यक आहे.

5.सोबत पॅन कार्ड व आधार क्रमांक नमुद करण्यांत यावा त्यांची छायांकित प्रत देण्यात यावी.

6.दरपत्रकामधील सेवा सर्व साधारणपणे ज्यांना सेवा देण्याबाबत कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यांनी वस्तू व सेवा कर (GST) क्रमांक व इन्कम टॅक्स क्लियरन्स सादर करणे अपेक्षित आहे.

7.परिषदेतील वसूल केलेले आयकर व जीएसटी विवरणपत्रे विहित दिनांकास सादर करण्याकरिता सनदी लेखापालाची नियुक्ती कार्यादेश आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षापर्यंत असेल. या कालावधीत आयकर व जीएसटी विवरणपत्रे विहित दिनांकास सादर करण्याकरिता व लेखाविषयक अंतर्गत लेखापरिक्षणाचे उदभवणाऱ्या त्रुटी व इतर खोळंबा याची संपूर्ण निराकरण करणे बंधनकारक राहतील.

8.परिषदेतील सनदी लेखापालाच्या सेवा देण्याबाबतचे देयक तीन प्रतीत व त्रैमासिक या कार्यालयास सादर करावे. तसेच प्रत्येक 3 महिन्यानंतर देण्यात आलेल्या सेवेची खात्री व त्याची तपासणी झाल्यानंतर देयक अदा करण्यात येईल.

9.सनदी लेखापालाची सेवा समाधानकारक नसल्यास देण्यात येणारी सेवा नाकारण्यात येईल. याची संपूर्ण जबाबदारी आपली राहील.

10.कोणतीही गोंधळात राहणारी किंवा वेगवेगळे अर्थ न निघणारी बाब दरपत्रकात राहणार नाही. याची काळजी घ्यावी.

11.कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक रद्द करण्याचा किंवा न स्विकारण्याचा अधिकार मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी राखून ठेवलेला आहे.



Scanned by CamScanner

12.लखोटा क्र.1 मध्ये सर्व तांत्रिक कागदपत्रे जोडून सिलबंद करण्यात यावा व त्यावर तांत्रिक कागदपत्रे बाबतचा लखोटा असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

13.लखोटा क्र.2 मध्ये वित्तीय दर सर्व करासहित नमूद करुन लखोटा सिलबंद करण्यात यावा व त्यावर दराचा लखोटा असे स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

14.लखोटा क्र.1 मधील दर्शविलेली प्रमाणपत्रे अपूर्ण असल्यास लखोटा क्र.2 वित्तीय उघडण्यात येणार नाहीत.

15.मंजूर होणाऱ्या संस्थेसोबत रुपये 500/- रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात येईल.

16.संस्थेकडून अटी नमूद करण्यात आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. परिषदेकडून याबाबत सबबी ऐकून घेतल्या जाणार नाहीत वा त्याकडून पत्रव्यवहार करण्यास परिषद बांधील राहणार नाही.

17.दरपत्रक धारकांनी खोटी व बनावट कागदपत्रे सादर केल्याचे तपासणी अंती आढळून आल्यास अशा दरपत्रक धारकांवर आवश्यकतेप्रमाणे फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत निर्णय घेण्यात येईल.

18.दिलेल्या मुदतीत आपली दरपत्रके या कार्यालयास प्राप्त न झाल्यास वरील सर्व संपूर्ण अटी मान्य नाहीत असे समजण्यात येईल.

19.परिषदेतील वसूल केलेले आयकर व जीएसटी विवरणपत्रे विहित दिनांकास सादर करण्याकरिता व लेखाविषयक अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामकाजाकरिता सनदी लेखापालाची नियुक्ती दोन वर्ष कालावधीसाठी करताना आवश्यक कामाचे स्वरुप सोबतच्या प्रपत्रात नमूद केले आहे. त्यानुसार दरपत्रक सादर करावे.

20.सदर दरपत्रक परिषदेच्या संकेतस्थळांवर www.mscepune.in उपलब्ध आहे.

6/7/2023

(शैलजा दराडे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - 411001

Scanned by CamScanner

प्रपत्र - अ लखोटा क्र.2 (वित्तीय दर) -

| अ.क्र. | कामाचा तपशील | दर एकत्रित / सर्व करांसहित (रुपये) |
|---|---|---|
| 1. | पहिला त्रैमासिक अहवाल सन 2023-2024 व 2024-2025 | |
| 2. | दुसरा त्रैमासिक अहवाल सन 2023-2024 व 2024-2025 | |
| 3. | तिसरा त्रैमासिक अहवाल सन 2023-2024 व 2024-2025 | |
| 4. | चौथा त्रैमासिक अहवाल सन 2023-2024 व 2024-2025 | |
| 5. | अंतर्गत वार्षिक अहवाल सन 2023-2024 व 2024-2025 | |
| 6. | अंतर्गत लेखा परीक्षणाकरिता लेखा विषयक लेखा संहिता व म.ना.से. नियमास अधिन राहून कामकाज करावे. | |
| 7. | अंतर्गत लेखापाल यांनी सदर कामाचे फी मध्ये सर्व करांचा समावेश करावा. | |
| 8. | लेखांकनामध्ये घेतलेल्या जमा व बँक खात्यावरील प्रत्यक्ष जमा यांचा ताळमेळ घ्यावा. | |
| 9. | परिषदेचे लेखा विषयक सल्लागार म्हणून कामकाज पहावे लागेल. | |
| 10. | लेजर, रिसिट पेमेंट, इन्कम आणि एक्सपेंडिचर, बॅलेन्स शीट चे अंतर्गत लेखा परिक्षण करावे. आर्थिक वित्तीय प्रपत्रे तयार करणे. | |
| 11. | लेखापरिक्षणात घेतलेल्या त्रुटींचे निराकरण करणेबाबत मार्गदर्शन करावे. | |
| 12. | लेखा विषयक असलेल्या अडी अडचणीबाबत योग्य ते मार्गदर्शन करावे. | |
| 13. | GSTR-7 मासिक विवरणपत्र (आकस्मिक खर्चातून GST/TDS) आयकर कार्यालयास सादर करणे. | |
| 14. | परिषदेतील अधिकारी/कर्मचारी यांचे आयकर संदर्भात फॉर्म नं.16, 24 Q चा त्रैमासिक अहवाल (वर्षात चार अहवाल) याबाबतचे आयकर संदर्भात संपूर्ण कामकाज करावे व 26 Q चा त्रैमासिक आयकर आणि आकस्मिक खर्च देयकाबाबत E-TDS विवरणपत्र संदर्भात संपूर्ण कामकाज करावे. | |
| 15. | कार्यालयातील जुन्या कार्यालयीन प्रकरणातील E-TDS सुधारित करुन आयकर कार्यालयास सादर करणे. | |
| 16. | GSTR-7 ठेकेदारांना देणे. | |
| 17. | E-TCS त्रैमासिक विवरणपत्र आयकर कार्यालयास सादर करणे. | |
| | एकूण अ.क्र. 1 ते 17 मध्ये नमूद केलेल्या कामाबाबत एकत्रित रक्कम | |



Scanned by CamScanner

**प्रपत्र - ब लखोटा क्र.1 (तांत्रिक कागदपत्रे) अर्जासोबत जोडवायचे आवश्यक कागदपत्रांची सूची**

| | | |
|---|---|---|
| 1. | सेवा देणाऱ्या संस्थेचे नांव | |
| 2. | संस्थेचा नोंदणी क्रमांक | |
| 3. | सेवा पुरवठादार / संचालकांचे नांव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक व ई-मेल | |
| 4. | अनुभवाचा तपशिल | |
| 5. | अर्जदाराचे ओळखपत्राचा तपशिल | |
| 6. | इतर माहिती (आवश्यक प्रमाणपत्राच्या झेरॉक्स) | |
| 7. | आयकर नोंदणी क्रमांक (पॅन) | |
| 8. | वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी | प्रमाणपत्र देणारे कार्यालयाचे नाव ---------------------------------------------- प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक ---------------------------------------------- वैधतेची मुदत ---------------------------------------------- |
| 9. | अटी, नियम मान्य असल्याबाबतचे संमती पत्रे जोडणे आवश्यक आहे. | |
| 10. | खालील तीन वर्षाचे आयकर क्लिअरन्स प्रमाणपत्र जोडले आवश्यक आहे. सन 2019-2020, 2020-2021, 2021-2022. | |
| 11. | स्थापनेपासून आजतागायत संस्था काळ्या यादीत नसल्याचे प्रमाणपत्र | |
| 12. | संस्थेचे C&AG कडे आर्थिक वर्ष 2022-2023 करीता नोंदणी केले प्रमाणपत्र | |
| 13. | ICAI कडे नोंदणी केलेले प्रमाणपत्र | |

**(सुचना- दरपत्रकामधील फॉर्म- अ मधील अ.क्र. 1 ते 13 मधील सर्व माहिती भरणे आवश्यक आहे. व त्या पृष्ठर्थ प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे.)**

मी / आम्ही खालील सही करणार असे शपथपूर्वक प्रमाणित करतो की, वरील नमुद केलेली माहिती खरी असून मला / आम्हाला सर्व अटी मान्य आहेत.

स्थळ:-

सही:-

दिनांक:-

नाव:-

शिक्का:-



Scanned by CamScanner

**सेवा पुरवठादाराने दरपत्रक सादर करतांना द्यावयाचे प्रमाणपत्र**

मी / आम्ही दरपत्रकातील व दरपत्रकासोबत जोडलेल्या अटी व शर्तीचे काळजीपुर्वक वाचन केले असून त्या सर्व समजून घेतल्या आहेत व त्यानुसार दरपत्रक, प्रपत्र अ व ब सोबत परिपुर्ण भरून दिलेले आहेत. तसेच मी / आम्ही या अटी व शर्तीनुसार मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे करिता आयकर व जीएसटी विवरणपत्रे विहित दिनांकास सादर करण्याकरिता व लेखाविषयक अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामकाजाकरिता सनदी लेखापालाची सेवा योग्यरित्या पुरवठा करण्यास बांधील राहु. सदर सेवा यामध्ये कोणत्याही प्रकारची हयगय व विलंब होणार नाही याची दक्षता घेवू. सदर सेवा योग्यरित्या कार्यरत ठेवण्याची संपुर्ण जबाबदारी आमची राहील.

दिनांक

स्थळ

सेवा पुरवठादारचे नाव, स्वाक्षरी व शिक्का



Scanned by CamScanner